
MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor: 6.91

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol.I, Issue-XXXVII, 2 October 2021



# महात्मा गांधी जीवन परिचय कार्य आणि विचार

Editor : Dr. Dharampurikar Bhalchandra Vaijanathrao

## Quarterly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

Scanned with OKEN Scanner

...de International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

# INDEX


| Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|
| PRINCIPLES OF MAHATMA GANDHI | Dr. Arun Mahadeo Rakh | 01 |
| MAHATMA GANDHI AND HIS VISION OF IDEAL SOCIETY | Dr. Tulshiram Laxman Dabde<br>Dr. Manoj Chandrashekhar Zade | 04 |
| महात्मा गाँधी जी के विचार में सामाजिक समानता | डॉ. शेख़ बेनज़ीर | 12 |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी का मानवतावादी दृष्टिकोण | डॉ. अलका पांडेय | 15 |
| वर्तमान युग में गांधीवाद की जरूरतों की आवश्यकता<br>भारतीय संस्कृति : समाजनीति | प्रोफेसर एवं डॉ रोहताश जमदग्नि | 18 |
| महात्मा गांधीजी के सामाजिक विचार | Dr. Shilpa Shah | 21 |
| मं. गांधी का सामाजिक कार्यो में योगदान | डॉ. चौधरी जे. ए. | 24 |
| महात्मा गांधीजींचे ग्रामस्वराज्य संबंधी चे विचार : तुलनात्मक व टीकात्मक | प्रा. डॉ. बनसोडे विलास भारतराव | 26 |
| महात्मा गांधीच्या अहिंसावादाची प्रासंगिकता व आजचे जग | डॉ. डी. डी. कोल्हेकर | 29 |
| महात्मा गांधीजींचे सत्य व अहिंसा विषयक विचार आणि कार्यपद्धती- एक अभ्यास | प्रा. प्रदीप नामदेव तायडे | 32 |
| २१ व्या शतकातील महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता | प्रा. डॉ. मलदोडे साहेबराव रामराव | 37 |
| महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार | प्रा. डॉ. विजयकुमार सोनी | 40 |
| महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार : एक आकलन | प्रा. डॉ. प्रकाश जंगले | 46 |
| महात्मा गांधीजींचे शेतीविषयक विचार | प्रा. रमेश शंकर माने | 49 |
| "महात्मा गांधींचे स्त्री शिक्षण विषयक विचार" | प्रा. कल्याण राजेंद्र वटाणे. | 55 |
| वर्तमानकाळात महात्मा गांधींच्या आर्थिक विचारंची गरज | डॉ. कल्पना भजनी<br>डॉ. कांचनमाला क्षीरसागर | 57 |
| मा. गांधी यांच्या आर्थिक विचारांची सार्थकता : एक अभ्यास | प्रा. डॉ. एस. एल. मेढे | 60 |
| महात्मा गांधी यांचे राजकीय विचाराची प्रासंगिकता | डॉ. दत्तात्रय मारुती काळेल | 63 |
| महात्मा गांधी : राजकीय नेतृत्व | प्रा. डॉ. विनोद जीवनतारे | 67 |
| म. गांधीजींची सत्याग्रहाची मुलतत्वे | प्रा. डॉ. भिमराव प्रल्हाद उबाळे | 71 |
| महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार | डॉ. राजेश्री अ. जाधव | 74 |
| लोकशाहीत महात्मा गांधीच्या नैतिक विचारांची प्रासंगिकता | श्री. हर्ष अरुण नेतकर | 77 |
| जैविक वाढिबाबत (स्वयंपूर्णता) महात्मा गांधीजींचे विचार | डॉ. रवींद्र बापुराव शेंडे | 81 |
| 'महात्मा गांधीचे आर्थिक विचार'' | प्रतिमा दादाराव वाढवे | 84 |




Scanned with OKEN Scanner

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

# जैविक वाढिबाबत (स्वयंपूर्णता) महात्मा गांधीजींचे विचार

डॉ. रवींद्र बापुराव शेंडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर (महा.) पिन. ४४२९०७

**प्रस्तावना:**

म. गांधीजींच्या मते गरजा मर्यादित करूनच जनकल्याण साधता येते. आज बऱ्याचश्या घरी होणारा पाण्याचा अपव्यय, विजेचा अपव्यय, अन्नाचा अपव्यय इ. अपव्यय घराघरातून सुरू असलेला पहायला मिळतो. आणि तो दिवसेंदिवस वाढत जात आहे. अपव्ययाबाबत ही मानसिकता न बदलल्यास जनकल्याणाचा मार्ग संकोचणार आणि अक्षतिपूर्ती हानी मोठी होईल. हा सर्व अक्षतिपूर्ति हानीचा भाग दूर करून जनकल्याण अधिक वाढविण्याकरीता अन्नाचा, पाण्याचा, विजेचा अपव्यय थांबविणे तसेच शिक्षणाबाबत सजक राहणे (शिक्षक, पालक आणि समाजाने), सेंद्रिय शेतीचा वापर, आपली वेशभूषा, आपले सणउत्सव, बालवयातील संस्कार या सर्वामध्ये मितव्ययता (अंतर्गत व बाह्य) आणूण अमीतव्ययता दूर करणे आत्मनिर्भर भारतासाठी आवश्यक आहे.गांधीच्या मते काटकसर म्हणजे शास्त्रीय पध्दतीने साधनांचा वापर होय. ही काटकसर व मितव्ययता प्रत्येकाकडून वाढत गेल्यास महात्मा गांधीच्या अशा विचारातून जूना तुटलेल ास्वयंपूर्णतेचा धागा पूर्ण जोडता येतो. थोडक्यात आत्मनिर्भर भारतासाठी काटकसर हे तत्व अतिशय महत्वपूर्ण आहे.

**बीज शब्द** मितव्ययता, अमितव्ययता, अक्षतिपूर्ती हानी, जैविक वाढ.

**विषयाची निवड**

महात्मा गांधींच्या स्वयंपूर्णता व अहिंसेच्या धाग्याद्वारे उपाययोजना शक्य आहे. या प्रेरणेतून व विश्वासातून हा विषय निवडण्यात आला आहे. विषयाच्या विश्लेषणासाठी दुय्यम सामुग्रीचाच आधार घेण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उदिष्ट्ये**

(१) आत्मनिर्भर भारतीय अर्थव्यवस्थेकरीता म. गांधीजींच्या विचारांचा अभ्यास करणे.

(२) म. गांधीजीच्या मते पाश्चिमात्य नवसंस्कृतीऐवजी स्वदेशी नवसंस्कृती विकसीत करणे आवश्यक आहे. याचा अभ्यास करणे.

(३) म. गांधीच्या मते 'स्वयंपूर्णता हे जीवनाचे मुळ तत्व आहे' याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीते**

(१) म. गांधींने शस्त्राऐवजी शास्त्राचा वापर करून शास्त्राला नैतिकतेची जोड दिली आहे.

(२) वैश्विक मानवता टिकविण्यासाठी म. गांधींचे विचार आवश्यक आहे.

**विषयाचे विश्लेषण**

**स्वयंपूर्णता ही आत्मकेंद्री वृती नाही तर साधनांचा सर्वोत्तम वापर होय.**

महात्मा गांधीजींनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्वयंपूर्णतेवर आपल्या कृतीतून भर दिला आहे. महात्मा गांधींच्या मते स्वयंपूर्णता हे जीवनाचे मुळ तत्व आहे. याचा पुरस्कार करतांना गांधीजी म्हणतात. आपले जीवन अन्य दुसऱ्या कुणावर अवलंबून असले तर ती व्यक्ती किंवा संस्था हिंसेच्या मार्गाने पिळवणूक करू शकते. श्रीमंत लोक गरिबांची, शहरे ग्रामीण भागाची, विकसीत देश, अविकसित देशांची पिळवणूक करतात कारण गरिब ग्रमीण भाग आणि अविकसीत देश स्वयंपूर्ण नसतात. स्वयंपूर्णता म्हणजे आत्मकेंद्रि वृत्ती नाही तर साधनांच्या सर्वोत्तम वापराला सामान्य मनुष्यकडून गती देणे आहे. अशी वृत्ती देशादेशांकडून वाढल्यास जनकल्याणात वाढ होईल. आपली वाढ आपल्या संसाधनांच्या क्षमतांच्या आधारे करणे म्हणजे जैविक वाढ होय. या जैविक वाढीमध्येच स्वयंपूर्णता समाविष्ट आहे.

**स्वदेशी नवसंस्कृती विकसीत करणे आवश्यक**

महात्मा गांधीजींच्या मते सर्व जगात भारत हा माझा सर्वाधिक प्रिय देश आहे. कारण सर्वसमावेशक विकास व शाश्वत विकासाकरीता जे जे म्हणून हवे ते सर्व उपलब्ध आहे. पाश्चिमात्यांजवळ देण्यासारखे खुप सारे आहे हे



Scanned with OKEN Scanner

वापर करणे आवश्यक आहे कारण आपणास माहित आहे की, गाय खरे असले तरी स्विकारू नयेत किंवा मर्यादित वापर करणे आवश्यक आहे कारण आपणास माहित आहे की, गाय जन्मदात्रीपेक्षाही अधिक श्रेष्ठ आहे.नचह.? परंतु एक – दोन वर्षे दुध पाजणारी आई पुढे जन्मभर सेवेची अपेक्षा करते. अगदी त्याचप्रमाणे पाश्चिमात्य राष्ट्रांची कृती आपल्या राष्ट्रासोबत घडलेली आहे. हा महत्वपूर्ण संदेश लक्षात घेऊन पाश्चिमात्य राष्ट्रांची मदत घेणे आवश्यक आहे. गाय आणि जन्मदात्री यांच्या भुमिका प्रत्येक देशात महत्वपूर्ण असल्या तरी त्या त्या राष्ट्रांनी त्याच्या मर्यादा ओळखणे आवश्यक आहे. निस्वार्थ मदत असल्यास निसंकोचपणे स्विकारणे आवश्यक आहे.

सद्यास्थितीत आज भारतात गुन्हेगारी वाढली आहे. अनेक चुकिच्या गोष्टी घडत आहे. अस्वच्छता वाढत आहे. प्रथा व परंपरा सोडण्याऐवजी त्या वाढत जात आहे. तिर्थस्थानी, रेल्वे, बसस्टॅड, शाळेसमोरील परिसर, गावातील प्रवेशद्वारासमोरील रस्ता, मंदिराजवळील अतिक्रमण, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता वाढली आहे. एकमेकांविरूध्द मतभेत वाढले आहे. दुसऱ्यांना माझ्याएवढे काहिच येत नाही असा गैरसमज वाढला आहे. आर्थिक विषमता, महागाई, गरिबी आणि बेरोजगारी या जुळ्या – जुळ्या समस्या तिव्र भिषण स्वरूप धारण करित आहे. असा अप्रिय भारत प्रिय करणे शक्य आहे काय? याचे उत्तर अगदी सकारात्मक देता येईल. यासाठी महात्मा गांधींचे समग्र विचार अमलात आणणे आवश्यक आहे. चुका झाल्या असल्या तरी निसर्ग सुध्दा चुका दुरूस्त करण्यासाठी संधी देत असतो, या तर सर्व मानवनिर्मित चुका आहे. त्या नक्की दुरूस्त करता येते.यासाठी प्रत्येकाकडे असणारे सार्थक कौशल्य याकडे वळविणे आवश्यक आहे. हिच अपेक्षा महात्मा गांधींजींची होती.

**अहिंसा आणि प्रगती यांचा संबंध**

गांधीजींच्या विचारात समतेला एक साधनमूल्य होते. समता हे स्वयंमेव साध्य नसून अहिंसा आणि स्वातंत्र्य ही मूल्ये समाजजीवनात रूजविण्याचे साधन आहे, अशी त्यांची भूमिका होती. ज्यांच्यात सारखेपणा आहे आणि समानतेची जाणीव आहे, त्यांचाच मिळून समाज बनतो. समानतेतून स्नेहाचे तत्व निष्पन्न होते. या स्नेहतत्वालाच गांधीजी 'अहिंसा' हे नाव देतात, असा अन्वय दादा धर्माधिकारी यांच्यासारख्या गांधीवादाच्या भाष्यकरांनी लावला आहे. अशा प्रकारे गांधींची अहिंसा म्हणजे केवळ करूना, दया किंवा मोक्षाचे साधन नसून ते एक सामाजिक मूल्य होते. सामाजिक पुरूषार्थाचे ते साधन होते.

हिंसेचे समाजातून निराकरण होत जाणे हेच त्यांना समाज विकासाचे लक्षण वाटते. ज्या समाजात साधनसामुग्री, सामाजिक पाश्वभूमी, सत्ता आणि व्यवसाय इत्यादी बाबतीत प्रचंड तफावत असते, तेथील समाजघटकांत संवाद अशक्य ठरतो. परस्परांना समजून घेणे आणि आपल्या कृतींचे इतरांवर काय परिणाम होतात, ते लक्षात घेणे तर त्यांना शक्य होतच नाही, पण सामाईक अनुभव मिळणे तर त्याहूनही दुरापास्त होते. हा सामाईक अनुभवच गांधींना समतेचा आधार वाटत होता. आणि सामुदायिक आणि व्यक्तिगतरित्या शरीरश्रम करण्यातूनच तसा अनुभव मिळू शकतो, अशी त्यांची धारणा होती "श्रम ही लोकांना एकत्र जोडणारी महान शक्ती आहे, समानीकरणाची प्रचंड प्रेरणा आहे." असा श्रमाचा गौरव त्यांनी केला होता. प्रत्येक व्यक्तींला तिच्या गरजांसाठी लागणाऱ्या संगळ्या गोष्टी पुरेशा प्रमाणात मिळणे, ही त्यांची आर्थिक समतेची व्याख्या होती. पण आर्थिक समतेसाठी बलवत्तर केंद्रसत्तेद्वारे उपाय योजना करणे मात्र त्यांना नामंजूर होते.

**विकेंद्रिकरण आणि सर्वसमावेशकता**

लोकांना सुखी करून त्यांची नैतिक व आध्यात्मिक उन्नती करणे हे आमचे ध्येय आहे. ते विकेंद्रिकरणाद्वारेच साध्य होईल. केंद्रिकरण धोका निर्माण करणारे साधन आहे. तर विकेंद्रिकरण धोका टाळण्याचे प्रमुख साधन आहे. विकेंद्रिकरण विम्याची भूमिका पूर्ण करते. अनिश्चिततेला आळा, प्रगतिला प्रोत्साहन विकेंद्रिकरणामुळे शक्य आहे. सध्या भारतात दिल्ली, मुंबई, इ मोठी शहरे आहे. त्यांची शक्ती ७.५० लाख खेडी व वाड्या, वस्त्यात वाटून देणे गरजेचे आहे. कारण आपल्या समाजाची मुळे ग्रामीण भागात रूजलेली आहे. (एखादया कल्पवृक्षाच्या मुळासारखी) श्रीमंत आणि गरिब रोग आहे. श्रीमंत हा महारोग तर गरिबी ही रोगासारखी आहे. या दोन्हीऐवजी सुखी समाधानी वर्ग निर्माण होणे आवश्यक आहे. कारण श्रीमतांची श्रीमंती त्यांच्या सुखाचे कारण नाही तसेच गरिबांची गरिबी हेही त्यांच्या दु:खाचे खरे कारण नव्हे अनेक श्रीमंत दु:खी आढळतात. तसेच अनेक गरिब सुखात असल्याचे आपण



Scanned with OKEN Scanner

ISSN – 2454 - 7905

घालतो. म्हणजेच या दोन्हीऐवजी सुखी–समाधानी वर्गच निर्माण होणे आवश्यक आहे. यासाठी विकेंद्रिकरणाचा आधार घेणे आवश्यक आहे. उद्योगात मालकी हक्क जरी केंद्रिकरण वृत्तीचे असले तरी उत्पन्न वितरणात विकेंद्रिकरण अपरिहार्य आहे. यामुळे विषमता निर्माण न होता समतेचा मार्ग प्रशस्त निर्माण होईल. एकूनच गाव, खेडे, शहरे, उद्योग, मोठे उद्योग अशा सर्वच क्षेत्रात विकेंद्रिकरण आवश्यक आहे. विकेंद्रिकरण शक्य नसेल तेथे उत्पन्न वितरणात किंवा नफा वितरणात किंवा सर्वत्र वितरणात विकेंद्रिकरण अस्तित्वात आल्यास सुखी – समाधानी आणि संपन्न वर्ग निर्माण होईल अशी अपेक्षा महात्मा गांधी यांना आपल्या समग्र विचारात अपेक्षीत होती.

**खेड्यांकडे चला व सद्यस्थिती**

शहरातील लोकांना वाटते की, भारत हा शहरांतून वसलेला असून शहरांच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठीच खेड्यांची निर्मिती झाली आहे. हा नकारात्मक दृष्टिकोण प्रथमत: शहरी लोकांनी बदलविणे आवश्यक आहे. खेड्यात ज्या समस्या आहे. त्या समस्या सोडविण्याची जबाबदारी आम्हा शहरवासीयांची आहे. हा संकल्प शहरी जनतेकडून अपेक्षित आहे. रोग असाध्य असला तरी डॉक्टर आणि परिचारिका रोग्याला वाऱ्यावर सोडून देत नाही, इलाज करतांना दिसते. अगदी त्याचप्रमाणे शहरी संस्कृतीने ग्रामीण संस्कृती वाचविणे आवश्यक आहे. शहरात राहण्याइतकेच खेड्यात राहणे सोपे होईल अशा रितीने शहरी लोकांनी व सरकारने प्रयत्न करणे गरजेचे आहे. व ग्रामवासीयांनी अशा सर्व शहरी व शासन कृतींना पुरेपूर प्रतिसाद देणे गरजेचे आहे. शहरी भारत व ग्रामीण भारताऐवजी अखंड भारताची कल्पना कर्तव्य आणि जबाबदारीतून एकमेकांनी पूर्ण करणे अपेक्षित आहे. सद्यास्थितीती शहरी व ग्रामीण भारत अशी जी विभागणी झालेली आहे, जे अंतर दिवसेंदिवस वाढत आहे. यासाठी एकमेकांविरूध्द असणारे कर्तव्य व जबाबदारी याची आठवण ठेवुन अखंड भारताला मात्रातमक व गुणात्मकतेच्या वारसा लाभणार अशी कृती प्रत्येकाकडून अपेक्षित आहे. यात ''खेड्यांकडे चला'' हे महात्मा गांधीचे घोषवाक्य या ठिकाणी प्रेरणास्त्रोत आहे.

**सर्वकल्याणकारी जिवणपध्दती**

भारतातील नव्हे तर संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था ही सर्वसमावेशक असावी. प्रत्येकाच्या किमान गरजांची पुर्ति प्रत्येकवेळी होण्यासाठी प्रत्येकांनी साधनांचा वापर कौशल्यपूर्ण करणे आवश्यक आहे. सर्वांचा सामाजिक दर्जा सारखाच आसावा. विश्वस्ताची भूमिका श्रीमंतानीच न वटविता गरिबांनाही ती वटविता येते. एकमेकांचे विश्वस्त बनल्यास (प्रत्येकाकडे देण्या – घेण्यासारखे काहीनाकाही असते हा विचार) जे शक्य असेल ते दिल्यास एकूण उत्पादनक्षमता राष्ट्राची वाढून सर्वकल्याणकारी जिवनपध्दती तयार करणे शक्य आहे. परंतु आज श्रीमंताच्या विश्वस्तेचा विचार होत आहे आणि गरिबांच्या विश्वस्तेचा विचार फारसा होत असलेला दिसत नाही. तो वाढणे अपेक्षित आहे. यातूनच देशाची अंतिम उत्पादनक्षमता व प्रत्यक्ष उत्पादनक्षमता यातील फरक नष्ट होऊन उत्पादनक्षमतेची अक्षयता वाढेल. पूढे यामार्फत सर्वकल्याणकारी जीवणपध्दती पूर्ण करणे कठिण जाणार नाही. हे सत्य आहे.

**सारांश**

प्रत्येक देशाच्या शासनाला जनतेचे कल्याण साधावयाचे असते आणि त्याचबरोबर अर्थव्यवस्थेचा विकासही करावयाचा असतो. विकासाची फळे सर्वांना मिळाली तर कल्यान आपोआपच होते.म. गांधी मते "आपली वाढ आपल्या साधनांच्या, क्षमतांच्या आधारे करणे म्हणजे जैविक वाढ होय." ही गांधी विचारसरणी विकासासाठी प्रत्येक राष्ट्राला आवश्यक आहे. जैविक वाढ व आत्मनिर्भरतेचा जवळचा संबंध आहे. एखादा कृतीमार्फत जैविक वाढ होत आहे काय ? स्वयंपूर्णता मिळत जात आहे काय ? याचा विचार प्रत्येकांकडून होणे अपेक्षित आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१) दै. वर्तमानपत्र (लोकसत्ता, लोकमत, सकाळ, देशोन्नती)

२) विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक अधिवेशन २०१९. डॉ. सुधिर बोधनकर यांचे विशेष व्याख्यान.

३) साठे मधुसुदन दत्तात्रय. जागतिक अर्थव्यवस्था. मेहता पब्लिशिंग हाऊस. २००७

४) लोकसत्ता – अर्थब्रम्ह २०१७

५) कुरूक्षेत्र वर्षे ६२/६३ फरवरी से दिसंबर २०१६